# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः19.11.2025** **वारःबुधवार**

1. राष्ट्रीय जल पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट राज्य म्हणून महाराष्ट्राचा राष्ट्रपतींच्या हस्ते गौरव; सर्वोत्कृष्ट शहरी स्थानिक स्वराज्य संस्था विभागात नवी मुंबई महानगरपालिकेला प्रथम पुरस्कार
2. भावी पिढ्यांचं आरोग्य जपण्यासाठी नैसर्गिक शेती हाच मार्ग असल्याचं राज्यपालांचं आवाहन
3. वैशिष्ट्यपूर्ण शहर विकासाच्या धोरणाला राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता आणि
4. बिबट्यांच्या समस्येला राज्य आपत्ती म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव मांडण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

**जल-पुरस्कार**

'हवामान बदलाचा जलस्रोतांवर परिणाम होत असून, जलस्रोतांच्या संवर्धनसाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करावं', असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. राष्ट्रपतींच्या हस्ते 2024 या वर्षासाठीचे राष्ट्रीय जल पुरस्कार काल नवी दिल्लीत प्रदान करण्यात आले; त्यावेळी त्या बोलत होत्या. मानवी जीवनातील पाण्याचं महत्त्व राष्ट्रपतींनी यावेळी अधोरेखित केलं. या सोहळ्यात महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट राज्य विभागात प्रथम पुरस्कारानं गौरवण्यात आलं. राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी राष्ट्रपतींच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला. सर्वोत्कृष्ट शहरी स्थानिक स्वराज्य संस्था विभागात नवी मुंबई महानगरपालिकेनं प्रथम पुरस्कार पटकावला. नाशिक जिल्ह्यातील कानिफनाथ जल वापर सहकारी संस्थेला 'सर्वोत्कृष्ट जलवापरकर्ता संस्था' हा दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. 'राज्य सरकारनं राबवलेल्या जलव्यवस्थापन धोरणांचा आणि शेतकरी, पाणीवापर संस्था तसंच प्रत्येक नागरिकाच्या सक्रिय सहभागाचा हा विजय आहे', अशी भावना विखे पाटील यांनी यावेळी व्यक्त केली. या कार्यक्रमाला केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील, जलशक्ती राज्यमंत्री व्ही. सोमन्ना आणि राजभूषण चौधरी उपस्थित होते.

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आंध्रप्रदेश आणि तमिळनाडूच्या दौऱ्यावर जाणार आहेत. पीएम किसान सन्मान निधीच्या 21 व्या हप्त्याचं वितरण आज पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. कोईंबतूर इथं होणाऱ्या मुख्य कार्यक्रमात पंतप्रधान देशातल्या 9 कोटी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात मिळून 18 हजार कोटी रुपये जमा करणार आहेत. नैसर्गिक शेतीविषयीच्या एका चर्चासत्रालाही पंतप्रधान उपस्थित राहणार आहेत. आंध्रप्रदेशात पुट्टपार्थी इथं श्री सत्यसाईबाबांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा गौरव करणारं टपाल तिकीट आणि नाण्याचं प्रकाशनही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

राज्यपाल

भावी पिढ्यांचं आरोग्य जपण्यासाठी प्रत्येक कुटुंबाला फॅमिली डॉक्टरपेक्षाही नैसर्गिक शेती करणारा शेतकरी अधिक गरजेचा ठरेल, असं प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केलं. पुण्यातील कृषि महाविद्यालयात आयोजित नैसर्गिक शेती परिषदेच्या उद्घाटनावेळी ते काल बोलत होते. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे आणि कृषि विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यावेळी उपस्थित होते.

नैसर्गिक शेतीसाठी योग्य बियाणे निवडणे, बीजामृत प्रक्रीया, घनजीवामृताचा योग्य प्रमाणात उपयोग, जमिनीचे आच्छादन आणि बहुपीक पद्धत या पाच बाबी महत्त्वाच्या असल्याचं राज्यपालांनी नमूद केलं. देशात नैसर्गिक शेती वृद्धिंगत होण्यासाठी कृषि विद्यापीठांची भूमिका अत्यंत महत्वाची असल्याचं सांगून ते म्हणाले....

**आपसे मेरा आग्रह है की इस दिशा में यूनिवर्सिटीज की बहुत बड़ी जिम्मेदारी है की हमारे देशी परंपरागत बीजों को उन्नत करना इस दिशा में काम करिए आप ये है जो सबसे ज़रूरी काम करने वाला बीज हमारे परंपरागत हो। लेकिन उनको कितना उन्नत बनाया जा सकता है ताकि वो ज्यादा से ज्यादा उत्पादन दे सके उनकी गुणवत्ता वही बनी रहे। उनमें रोग से लड़ने की रेजिस्टेंस भी बनी रहे और उत्पादन भी ज्यादा दे ये मूल काम सबसे जरूरी है जो यूनिवर्सिटीज का इस दिशा में आप काम करिए।**

**निसर्गोपचार**

राष्ट्रीय निसर्गोपचार संस्थेनं निसर्गोपचार दिनानिमित्त आयोजित केलेल्या तीन दिवसांच्या नैसर्गिक खाद्य महोत्सवाचा समारोपही काल राज्यपालांच्या उपस्थितीत झाला. येवलेवाडी इथल्या निसर्गग्राम परिसरात झालेल्या या कार्यक्रमाला केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव हे देखील उपस्थित होते. निसर्गोपचार ही केवळ उपचारपद्धती नाही, तर निसर्ग आणि माणूस यांच्यात समतोल साधणारी जीवनशैली आहे. निरोगी, आत्मनिर्भर आणि अध्यात्मिक अधिष्ठान असलेला सुदृढ समाज घडण्यासाठी महात्मा गांधी यांनी दिलेला निसर्गोपचाराचा हा वैचारिक वारसा आहे, असं प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी यावेळी केलं. निसर्गाशी एकरूप होत संतुलित आहार, योग्य व्यायाम, सकारात्मक चिंतन आणि चांगली जीवनशैली अंगिकारली, तर शरीरातील रोग बरे करण्याची ऊर्जा शरीरातच तयार होत, असं प्रतापराव जाधव यावेळी म्हणाले.

**मंत्रिमंडळ निर्णय**

राज्यात संकल्पना आधारित एकात्मिक वसाहती किंवा व्यावसायिक क्षेत्राची निर्मिती करण्याच्या दृष्टीनं वैशिष्ट्यपूर्ण शहर विकासाचं धोरण राज्य सरकारनं जाहीर केलं आहे. मुंबईत काल झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या धोरणाला मान्यता देण्यात आली. सिडकोसह, विविध प्राधिकरणांच्या जमिनी आणि भूखंडाचा सुयोग्य वापर निश्चित करण्याला या धोरणात प्राधान्य असणार आहे.

बृहन्मुंबई उपनगरातल्या वीस एकर किंवा त्यापेक्षा अधिक क्षेत्रफळावर म्हाडाच्या गृहनिर्माण प्रकल्पांचा पुनर्विकास करण्याबाबतचं धोरणही निश्चित करण्यात आलं आहे. यातून मुंबई शहर आणि उपनगर क्षेत्रात मोठ्या प्रमाणात परवडणारी घरं उपलब्ध होतील. भूसंपादन, पुनर्वसन, पुनर्स्थापनेची प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी नवीन पदांची निर्मिती करण्यालाही मंत्रिमंडळानं काल मंजुरी दिली.

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाकरिता शिक्षकांची 232 आणि शिक्षकेतर 107 पदं अशी 339 पदांची निर्मिती करण्याचा प्रस्ताव बैठकीत मंजूर झाला. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंध कायद्यातील मानहानीकारक शब्द वगळण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

**बिबट्या**

राज्यात बिबट्यांच्या वाढत्या मानवी हल्ल्यांची समस्या 'राज्य आपत्ती' म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव पुढील मंत्रिमंडळ बैठकीत मांडावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिले. बिबट्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी

आवश्यक ठिकाणी तातडीने पिंजरे बसवावेत आणि पुणे जिल्ह्यात बिबट्यांच्या उपचार आणि पुनर्वसनासाठी दोन बचाव केंद्र पुढील दोन ते तीन महिन्यांत सुरू करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी संबंधित विभागांना दिले.

यासंदर्भात काल मंत्रालयात फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, वनमंत्री गणेश नाईक आणि संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांशी संवाद साधून बिबट्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी करत असलेल्या उपाययोजनांबद्दल माहिती दिली....

**जुन्नरच्या परिसरामध्ये माणिकडोहला एक बिबट्याचं केंद्र निर्माण केलेलं आहे तशा पद्धतीनं दोन सेंटर ही बिबट्यांची सुरू करायची आणि त्याच्यामध्ये हे बिबटे पकडून ते तिकडे न्यायचे त्याच्यामध्ये ठेवायचे जे दोन सेंटर सुरू करायचे त्याचा प्लॅन एस्टीमेट ताबडतोब करायला सांगितलेलं आहे त्याला साठ एकराच्या पुढे जागा लागते पण ते सेंटर फॉरेस्टमध्येच सुरू करायचे आहेत फॉरेस्टला तशा प्रकारची जागा उपलब्ध आहे आणि ते बिबटे पकडून त्याच्यामध्ये ठेवायचे त्या बाकीचं जे काही असेल तो खर्च देखील केंद्र सरकार आणि राज्य सरकार मिळून त्या फॉरेस्ट डिपार्टमेंट मिळून त्यातून मार्ग निघेल.**

**जीएएमई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत काल राज्यशासन आणि ग्लोबल अलायन्स फॉर मास आंत्रप्रुनरशिप म्हणजे जी ए एम ई यांच्यात सहकार्य करार झाला. राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या क्षमता वाढवण्याला यामुळे मोठा वेग मिळणार आहे. या करारामुळे सूक्ष्म उद्योगांना लघु आणि मध्यम पातळीवर नेण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण आणि मार्गदर्शन मिळणार असल्यानं प्रत्यक्ष रोजगारनिर्मिती मोठ्या प्रमाणात वाढेल, अशी अपेक्षा आहे.

**क्रीडा**

महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रात मानाची समजली जाणारी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धा येत्या 7 डिसेंबर रोजी होणार आहे अशी माहिती आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन ट्रस्टचे विश्वस्त अभय छाजेड यांनी काल पुण्यात पत्रकारांना दिली. शाश्वत पर्यावरणासाठी धावा अशी या स्पर्धेची यंदाची संकल्पना आहे. या स्पर्धेसाठी इथिओपिया, केनिया, टांझानिया, मॉरिशस या देशातील 70 धावपटू सहभागी होणार आहेत. त्याचप्रमाणे करगिल आणि लडाखमधील मॅरेथॉन विजेतेही या स्पर्धेत धावणार आहेत. स्पर्धेतील विजेत्यांना पुणे महापालिकेकडून 30 लाख रुपयांपर्यंतची पारितोषिकं देण्यात येणार आहेत.

**हवामान**

राज्याच्या बहुतांश भागात थंडीचं प्रमाण वाढलं आहे. येत्या 24 तासात सर्वत्र हवामान कोरडं राहील. मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी थंडीची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.